International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor – 7.065
Vol.8 No.2 Nov – Dec 2020

# हंबीरराव मोहिते – एक अभ्यास

**डॉ. अभय पाटील**

इतिहास विभाग

स.गा.म.कॉलेज, कराड

## गोषवारा:

हंबीरराव मोहिते हे छत्रपती शिवाजी महाराजांचे सरसेनापती होते त्यांची नेमणूक इ.स. १६७४ साली झाली. हंबीररावांचे पणजोबा रतोजी मोहिते यांनी निजामशाहीत मोठा पराक्रम गाजविला होता. त्यांना निजामशाहीने "बाजी" किताब दिला होता. मोहिते घराण्यातील पराक्रमी पुरुष तुकोजी मोहिते हे तळबीड या गावची पाटीलकी सांभाळत होते. या घराण्याने घाटगेआणि घोरपडे घराण्यांशी सोयरीक जुळवून आणली याच दरम्यान शहाजीराजे यांच्याशी या घराण्यातील संभाजी व धरोजी मोहिते यांचा संबंध येउन धारोजी शहाजीराजांच्या लष्करात सामील झाले. संभाजी मोहिते व धारोजी मोहिते त्या काळातील पराक्रमी सेनानी होते. त्यांच्या शौर्याची गाथा आदिलशाही फर्मानामध्ये पहावयास मिळते.

स्वराज्याच्या स्थापनेवेळी संभाजी मोहिते हे शहाजी राजेंच्या लष्करात सहहवालदार होते. ते पुढे कर्नाटकला गेले मात्र त्यांनी आपली मुलगी सोयराबाई हिचा विवाह छत्रपती शिवाजी महाराजांशी लावून दिला व भोसले घराण्यशी पुन्हा नाते निर्माण केले. पुढे संभाजी मोहिते यांचा मुलगा हंसाजी मोहिते यांनी आपली मुलगी ताराबाई हिचा छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुत्र राजाराम महाराजांशी लावून दिला. त्यामुळे मोहिते घराणे हे छत्रपती शिवाजींचे अगदी जवळचे घराणे झाले. यातील संभाजी मोहि तेचा मुलगा म्हणजे हंसाजी ऊर्फ हंबीरराव मोहिते

छत्रपती शिवाजी महाराज यांनी हंसाजी मोहिते यांना हंबीरराव हा किताबदेऊन आपल्या सेनेचे प्रमुख सेनापती म्हणून नेमले बहलोलखानाशी लढताना प्रतापराव गुजर २४ फेब्रुवारी १६७४ रोजी मरण पावल्याने हंबीररावांची त्यांच्या जागी नेमणूक झाली. महाराजांच्या द्वितीय पत्नी सोयराबाई या हंबीरराव मोहित्यांच्या भगिनी होत्या. हंबीररावांच्या कन्या महाराणी ताराबाई ह्या राजाराम महाराजांच्या

पत्नी होत्या. ज्यावेळी प्रतापराव पडल्याचे कळाले तेव्हा हंबीररावांनी आदिलशाहीच्या सेनेवर जबरदस्त हल्ला केला. शत्रूला विजापूर पर्यंत पिटाळून लावण्यात हंबीररावांचे मोठे योगदान आहे

छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेकानंतर मोगल सुभेदार दिलेरखान व बहादूरखान यांच्या छावण्यांवर हल्ला करण्याचा आदेश हंबीररावांना दिला ही स्वारी यशस्वी करून त्यांनी खानदेशातील मोगलांच्या खानदेश, बागलाण, गुजरात, ब-हाणपूर, वऱ्हाड, माहूड, वरकड पर्यंतच्या प्रदेशात धुमाकूळ घातला. यानंतर (सन १६७६) सरसेनापती हंबीररावाने कर्नाटकातील कोप्पलयेथील आदिलशाही पठाणी सरदार हुसेनखान मियाणाचा येल्बुर्गा येथे मोठा पाडाव करून त्याच्या जुलमातून रयतेची मुक्तता केली सरसेनापती हंबीररावांच्या तलवारीची कमाल या विषयीचे वर्णन बखरीतून आलेले आहे. (अशीच एक तलवार प्रतापगडावरील भवानी मातेच्या मंदिरात आहे. तिच्यावरती सात नॉचेस आहेत, ते हंबीररावांनी केलेल्या पराक्रमाच्या निशाण्या आहेत.)

हुसेनखानाला कैद करून सेनानी धनाजी जाधव व सरसेनापती हंबीरराव मोहिते हे छत्रपतीनागोवळकोंड्यात भागानगर येथे येऊन मिळाले. यानंतर महाराजांना आपले बंधू व्यंकोजीराजे बरोबर सामोपचाराने चांगले संबंध निर्माण करावयाचे होते. मात्र व्यंकोजींची भेट यशस्वी झाली नाही. पुढे महाराजांनी कर्नाटकातील मोहीम आटोपती घेतली आणि ते महाराष्ट्रात आले. त्यानंतर महाराजांनी लहान पुत्र राजाराम महाराजांचा प्रतापराव यांची मुलगी जानकीबाईशी विवाह घडवून आणला. त्यानंतर अवघ्या दहा ते बारा दिवसांनी छत्रपती शिवाजीराजांचे निधन झाले. यावेळी हंबीरराव कऱ्हाड परिसरात छावणी टाकून होते. मोहिते घराण्याच्या इतिहासाला ज्ञात असलेला पुरुष म्हणजे रतोजी मोहिते.

## प्रास्ताविक:

छ. शिवाजी महाराजांचा सेनापती कडतोजी गुजर यांनी सन१६७० च्या वणी-दिंडोरीच्या लढाईत व सन १६७२ च्या साल्हेर-मुल्हेरच्या मैदानावरील लढाईत मोरोपंताबरोबर मर्दुमकी गाजवली. एप्रिल १६७३ च्या दरम्यान कडतोजी गुजर व बल्लोलखान यांच्यात उमराणी येथे लढाई झाली. खानाचा संपूर्ण नाश करण्याची संधी

असताना दया दाखवून सेनापती कडतोजी गुजर यांनी त्यास सोडून दिले नंतर त्यांनी हुबळीही घेतली पण लगेचच बल्लोलखान इर्षेने परत आला. कडतोजी गुजरांनी छ. शिवाजींच्या नाराजीमुळे घाईने सहा नौकांसह बल्लोलवर नेसरी येथे चाल केली. त्यात त्याला मृत्यू आला. सेनापती पडल्याचे पाहून सैन्य घाबरले. बल्लोलखानाचा अधिकारी अब्दुल करीम कडतोजी गुजरांच्याफौजेचा पाठलाग करीत होता. त्यांच्यावर हंसाजी मोहिते याने ताज्या दमाच्या तुकडीसह अचानक हल्ला करून मराठयांचा पराभव होण्याच्या बेतात असता त्याचे विजयात रुपांतर केले. परिणामी शिवाजीने लवकरच ता. १८ एप्रिल १६७४ दिनी चिपळूण मुक्कामी सैन्य पाहणी करीत असता हंसाजीस'हंबीरराव' हा किताब दिला व आपल्या सैन्याचे त्यास 'सरनोबत' केले. सदर पदोन्नतीच्या प्रसंगाबद्दल बखरकार सभासद लिहितात, "सरनोबतास माणूस पाहता हंसाजी मोहिते म्हणून पागेमध्ये जुमला होता बारा शहाणा मर्दानी सबुरीचा चौकस शिपाई मोठा धारकरी पाहून त्यास हंबीरराव नाव किताबती देऊन सरनोबती सांगितले." [१]

## हंबीररावांचा पराक्रम:

हंसाजी मोहिते हे मूळ बीड परगण्याचे बारगीस्जुमला पंच हजारी ते सरनोबत व नंतर सेनापती हि पदे त्यांनी आपल्या तलवारीच्या जोरावर मिळवली बाहुबलाच्या बहादुरीबरोबर इमान व स्वामीनिष्ठा हे इतिहासकारांनीत्यांचे वाखानलेले गुण होते की ज्याच्यामुळे त्यांची सतत बढती होत राहिली. स्वरीतील खंडणी ते इमाने इतबारे कसोशीने महाराजांकडे आणून हजार करीत. त्यामुळे काहीसे मानी असूनही राज्याभिषेकाच्यावेळी सुवर्ण क्षणांचे सेनापतीपदत्यांना मिळाले. या दैवदुर्लभक्षणी ते छत्रपतींच्या दक्षिण बाजूस दुधाने भरलेला रौप्य कलश घेऊन उभे असल्याची नोंद सापडते. [२]मस्तकावर अंकुश धरून हंबीरराव महाराजांसमवेत गजारूढ होते. मध्ययुगीन ----- इतिहासातील या सुवर्ण क्षणांचे ते सरसेनापती आहेत. जशी त्यांची समशेर चालली तसे त्यांचे नशिबही बलवत्तर. सरदेसाई, मुख्य प्रधान पेशवे मोरोपंत पिंगळे यांच्या खालोखाल सेनापतीचा अधिकार असे प्रकट करतात. [३] हंबीरराव प्रभूतीनी शिवतेजातच आपले तेज मिसळले आहे

हंबीररावांच्या गुणास सेनापती झाल्यावर विशेष वाव मिळाला. सारे शौर्य व कसब पणाला लावून त्यांनी शिवशाही मजबूत केली. बहादूरखान व दिलेरखानासारख्या सरदारांना न जुमानता सन १६७५ मध्ये ब-हानपर्यंतच्या मोगल मुलखातून संपत्ती मिळवली. सभासद लिहितात, "हंबीरराव सरनोबत फौज घेऊन मोगलाईत निघाले. खानदेश, बागलाण, गुजरात, अहमदाबाद, ब-हानपूर, वऱ्हाड, माहूर, वरकड हे करून दस्त केला. मालमत्ता अगणित जमा करून चालले. बहादूरखान कुळ जमाव घेऊन आपले देशात आले. मालमत्ता राजे यास दिली."[४]

## दक्षिण दिग्विजयामध्ये योगदान:

छ. शिवाजी महाराजांनी भागानगरास भेट दिली. त्यावेळी हंबीरराव त्यांच्याबरोबर होते. शिवाजीराजे पुढे कर्नाटकातून जिंजीकडे निघाले जानेवारी १६७७ हंबीररावानी गदग प्रांतावर स्वारी करून कोप्पळ दक्षिण दरवाजा जिल्ह्याचा मुख्य अधिकारी विजापुरी सरदार हुसेन खान मियान याचा गुलबर्गा येथे जबर पराभव केला. या मियान बरोबर झालेल्या लढाईचा सरकार यांनी दिलेल्या फारशी लेखातील संदर्भ बराच बोलका, "मियानी शरीरे करून कजाखही विशेष हंबीररावाजवळ सरजाम थोडी, मियानाची जमियत मोठी असे असता हंबीररावाने वीज चकाकता अंधकार दूर होऊन शुद्ध उदकधारा नजरेत येते तद्वत सैन्यात हल्लकल्लोळ होऊन खानाचे लोकांनी जसे वेणीचे केस दुभांग करून स्त्री वेणी घालते अशा रीतीने हंबीररावाने हत्यार चालविताच फळी फुटून दुभांग केले शेकडो मनुष्य जाता येता मारले. खान नामाहरम होऊन पळू लागले. मियानास सोडविण्यास आणखी फौजे चालून आली हे ऐकून धनाजी जाधव हंबीररावांचे मदतनीस धावून आले मग चहूकडून लांडगेतोड करून बेजार करून दिले, चालत्या मार्गी लांडगे वृकासारखे पाडाव करावे याप्रमाणे विजापुरास पोहोचेपर्यंत गलबत करून दिली." [५] असे पराक्रम करून विजापुरी फौजात घालवून देऊन व मियानात कैद करून धनाजी व हंबीरराव गोवलकोंडा येथे शिवाजीस सामील झाला. हुसेनखान मियान विजापूरच्या बलिष्ठ सरदाराचा पराभव व नंतरचे कर्नाटकातली विजय हा हंबीररावांचा खास पराक्रम होय.

हंबीररावांना लढाईमध्ये पराजय जणू माहीतच नव्हता. कर्नाटकातून परतताना शिवाजीराजांनी हंबीररावांना व्यंकोजीजवळ जिंजीस ठेवले होते. व्यंकोजी व हंबीररावयांची लवकरच लढाई झाली. हंबीररावांनी व्यंकोजी राजीयांची फौज मोडली. मोठे युद्ध झाले. अगणित रण पडले. १६७७ ला अहिरी येथे व्यंकोजीचा पराभव करून त्यांनी कृष्णा व तुंगभद्रा यामधील दुआबही जिंकला. हंबीररावांच्या देखरेखीसाठी झालेल्या दक्षिण स्वारीची मिळकतही युरोपियन जाणकारांचेही डोळे दिपवणारी ठरली. मद्रास, पॉडेचेरीही केंद्रे जिंजी आणि वेलोर या बिनीच्या दोन किल्ल्यांची किंमत त्यावेळच्या युरोपियन व्यापार्यांनी ५५० हजार स्टर्लिंग पौंड इतकी केली आहे. हुसेनखान नंतर पुन्हा लोदिखन नामक सरदाराचा त्याच्या सैन्याचा पाडाव केला. शत्रूची वाटेतील ठाणी सर करीत हंबीरराव महाराजांकडे येऊन दाखल झाले[६]

सन १६७८ संभाजीराजे दिलेरखानाकडे गेले. त्यांना परत मिळवण्यासाठी हंबीररावांची रवानगी झाली. हंबीरराव संभाजीस भेटण्यापूर्वी तेदिलेरखानाच्या छावणीत पोहोचले होते. संभाजीराजे व हंबीरराव यांचेप्रथमपासूनच संबंध सलोख्याचे असावे असे अनुमान काढता येते. त्यांना स्वराज्यात परत आणण्यात हंबीररावांना लगेच यश आले नाही. पण दिलेरखानास त्रस्त करण्याची त्यांची कामगिरी उल्लेखनीय आहे. संभाजीराजांबद्दलचा हा कठीण पेच प्रसंग दिलेरखानाच्या आसपास हंबीरराव असमानच सुटला व रातोरात संभाजीराजे विजापूरहून पन्हाळयावर आले.

## छ. संभाजीराजेंचे सेनापती:

शिवाजी महाराजांच्या अंतकाळी हंबीरराव कऱ्हाडच्या बाजूस होते. सोयराबाईंच्या पक्षाकडून त्यांना तयार राहण्यास सांगितले होते. सोयरा बाईंचे बंधूच असल्याने हि मंडळी हंबीररावांबद्दल निश्चिंत असावी. पण घडले आगळेच! पन्हाळा व कोल्हापूरकडील शिवाजीच्या सैन्यास आपल्याकडे वळविण्यास संभाजीला यश आले. काळ, वेळ व सैनिकांचा काळ पाहून आणि प्रजेचाही अंदाज घेऊन हंबीररावांनी संभाजी राजांच्या जेष्ठत्वाचा हक्क मानला. ते संभाजीराजांना मिळाले. रायगडावरील अष्टप्रधान मंडळ व सोयराबाईंच्यापक्षास त्यांनी नामोहरम केले. [७] संभाजीराजांना ते मिळाल्याने पुढील

राजकारणाचा सगळाच रंग पालटला. हंबीरराव अनुभवलेले व तोलामोलाचे सेनापती होते त्यांच्यामुळेच संभाजीचा पक्ष प्रबळ झाला व रायगडावरील राजकारण गडगडले परिस्तिथीचा अंदाज चटकन जसा हंबीररावांनाआला तसा अन्य ज्येष्ठांना आला नाही. त्यामुळे काही दु खःद घटना या संदर्भात घडल्या

पुढे हंबीररावांच्यामुळे लष्करी बाबतीत तरी संभाजीराजे निर्धास्त होते दक्षिणेत हरजीराजे महाडिक व उत्तरेत हंबीरराव, धनाजी जाधव, संताजी घोरपडे, यांच्या दोहोंकडील साथीमुळे औरंगजेबाच्याअहमदनगर सोलापूरच्या परिस्थितीतही बराच काळ फरक पडला नाही. पण लवकरच काळाची पाऊले उलटी पडू लागले. सन १६८७ ला प्रथम जालना येथे मोघालांशी झालेल्या लढाईत हंबीरराव प्रथम जखमी झाले. लवकरच महाबळेश्वरच्या आसपास वाई देशात नव्या मोगल सैन्यासह मराठ्यांशी धुमश्चक्री औरंगजेबानेपुर्ततेने सुरु केली.

## मृत्यू:

मराठयांचा कडवा विरोध पाहून विजापूर, गोवळकोंडापर्यंत औरंगजेबाने मराठ्यांशी सावधगिरीने युद्ध कूर्मगतीने चालविले. पुढे विजापूर पडल्यावर जतचे डफळे, मुधोळचे घोरपडे, सावंतवाडीचे सावंत हे मोगलांना मिळाले. औरंगजेबाने गोवळकोंड्याचे राज्यही खालसा केले होते. सर्व शक्तीनिशी तो आता मराठ्यांकडे वळला. विजापूरचा प्रसिद्ध सरदार सर्जाखान औरंगजेबाच्या पदरी आला. बादशाहने त्यांस संभाजीचा मुलुख सर करण्यास धाडले. कित्येक मोघलहीत्याच्या बरोबर धाडले. सर्जाखान विजापूरच्या राजकारणाचा सूत्रधार व महाराष्ट्राच्या मुलखाचा जाणकार होता. डिसेंबर १६८७ ला तो वाई प्रांतावर प्रथमतः चालून आला. हंबीररावानी त्याला महाबळेश्वरच्या डोंगरांच्या ---- रोखले. पण स्वतःहंबीरराव त्याच्या बरोबरच्या लढाईत तोफगोळा लागून जबर जखमी झाले व त्यातच त्यांचा मृत्यू झाला[८] विजय मिळूनही मराठ्यांना सेनापती गमवावा लागला. वीरमरणाचा हा पहिला वस्तुपाठ आलमगीर बादशहा बरोबर सुरु झालेल्या झुंजीत हंबीररावांनीघालून दिला. विजय मिळवूनही संभाजीराजांची ढालतुटली. दोन वर्षांनी पुढे घोंगावणाऱ्या काळाची हि जणू चाहूल होती. पण 'वीरभोग्यवसुंधरा' या संस्कृत वचनाचे

प्रत्यंतर म्हणजे हंबीररावांचे जीवन,रणक्षेत्रावर उठलेले वादळ रणक्षेत्रावरच शांत झाले. ज्या मस्तकावर शिवछत्रपतींनी सन्मान चढविला ते शिर त्यांनी शंभू राजे वस्वराज्यासाठी शिवभूमीत ऐन अडचणीत सर्वप्रथम ओवाळून टाकले.

## इतिहासकारांची मते:

शर्थीच्या युद्धात हंबीररावांनी सतत आपली तलवारतळपत ठेवली. किंकेड हा इटालियन इतिहासप्रेमी म्हणतो," हंबीर रावांना जर युद्धात मरण आले नसते तर जिंजीवर स्थापन झालेल्या सत्तेच्या जोरावर व दक्षिणेकडील सामग्रीच्या सहाय्याने मोगली सत्तेचा बिमोड करू शकले असते."[८] रियासतकार सरदेसाई लिहितात, "हंबीराव जिवंत असेपर्यंत लष्करी बाबतीत संभाजीस काही उणे पडले नाही. त्यांच्या पश्च्यात तो सर्वस्वी कलशाच्या अधीन झाला."[९] पुढे ते म्हणतात, " शिवाजींच्या या महान सेनापतीचा अत्यंत आणीबाणीच्या वेळी मोगलांच्या दांडगाईच्या झंझावातानेमृत्यू होऊन मोगलांस अलभ्य लाभ झाला."[१०]

## इतर गुण:

पराक्रमाबरोबर हंबीर रावांना माणसांची पारखही होती याची साक्ष म्हणजे धनाजी जाधव व संताजी घोरपडे हे पराक्रमी सरदार त्यांच्याच हाताखाली तयार झाले. दक्षिणेतील मोहिमेत या तरुणांच्या कामगिरीवर प्रत्यक्ष शिवाजीराजेही खुश झाल्याचे पुरावे मिळतात पुढे मराठ्यांच्यापडत्या काळात याच तरुणांनी स्वराज्याचे तारू सावरले.[११]

## निष्कर्ष:

इनाम व स्वामिनिष्ठा याबाबत खास उल्लेख हंबीररावांचा इतिहासकारांनी वारंवार केला आहे. स्वतःच्या सर्व शक्ती छ. शिवाजी व संभाजीच्या स्वराज्याभोवती लावल्याने स्वतःचा सवतासुभा कधीही न मांडल्यामुळेअष्टप्रधानात ते खास उठून दिसतात. काळाचे भान परिस्थितीचे आकलन याच बरोबर आपली बलशाही तलवार आहे. याचेही त्यांना

भान टी वापरताना भान असे. प्रत्यक्ष बहिण व होऊ घातलेल्या छत्रपती भाच्याचा पक्ष सोडून सैनिक व प्रजेचा काळ ओळखून त्यांनी छ संभाजीचा पक्ष स्वीकारला.

**संदर्भसूची-**


१. डॉ. पठाण यु. म. (संपा), सभासद बखर, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती मार्च २००२, पृष्ठ १०२.

२. डॉ. ताकवले प्रभाकर, शिवशाहीतील अष्टप्रधान, प्रकाशक जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाजमंत्री, जळगाव, प्रथम आवृत्ती १९६६, पृष्ठ १२.

३. सरदेसाई गो. स. मराठी रियासत खंड पहिला, दूसरी आवृत्ती १९७५, प्रकाशन केशव भिकाजी ढवळ, मुंबई, पृष्ठ ७०.

४. डॉ. पठाण यु. म. (संपा), सभासद बखर, उपरोक्त,पृष्ठ १०५.

५. डॉ. ताकवले प्रभाकर, उपरोक्त, पृष्ठ १४.

६. कित्ता, पृष्ठ १४.

७. कित्ता, पृष्ठ १५.

८. कित्ता, पृष्ठ १६.

९. सरदेसाई गो. स. मराठी रियासत खंड २, पॉप्युलर प्रकाशन, तिसरी आवृत्ती, १९३५, पृष्ठ १०९.

१०. कित्ता, पृष्ठ ११०.

११. डॉ. ताकवले प्रभाकर, उपरोक्त, पृष्ठ १७.